Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | Feb - 2016

# भारतीय शेतकऱ्यांपुढील समस्या व शेती समोरील आव्हाने

प्रा. किशोर हरिष धोटे
अर्थशास्त्र विभाग , धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर.

## प्रस्तावना :



भारत हा कृषीप्रधान देश असून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ आहे. शेती हा भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे बहुसंख्य लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती आहे. आज कृषीप्रधान भारतीय विकसनशील अर्थव्यवस्थेसमोरील कृषी विकासासंदर्भात चिंतेची बाब असून याचा परिणाम भारतीय शेतकऱ्यावर झाल्यामुळे ही सर्वात मोठी खेदाची बाब आहे. जर शेतकऱ्यावरच संकट आले तर संपूर्ण भारतावर संकट आल्याचे राहणार नाही. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे असे म्हटले जाते परंतु शेतकरी जर उपाशी पाटी राहत असेल तर एक दिवस असा येणार की सर्वांनाच उपाशी राहावे लागेल. म्हणून शेतकऱ्यांच्या समस्येचा विचार करुन त्यावर उपाय योजना करणे गरजेचे आहे. या प्रस्तुत वित्तीय समस्येवर आर्थिकदृष्ट्या चिकित्सा होऊन त्वरीत उपाययोजनांची नितांत गरज आहे. अन्यथा भारतीय कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा कणा मोडल्याशिवाय राहणार नाही.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) भारतीय शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.
२) भारतीय शेती समोरील उदभवणाऱ्या आव्हांनाचा अभ्यास करणे.

## भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या

आज भारतीय शेतकऱ्यांपुढे मुख्य समस्या आहे की, कशाप्रकारे शेतकऱ्यांना वित्तीय साहाय्यता करून त्यांना आर्थिक निर्भल करता येईल. भारतीय शेतकऱ्यांमध्ये अल्प व सिमांत भूधारक शेतकरी असल्या कारणास्तव त्यांच्याकडे पर्याप्त साधनांचा अभाव आहे, अशा परिस्थितीत कृषीवित्तच्या योग्य व्यवस्थेद्वारा शेतकऱ्यांना विकासाच्या उद्देशाने पर्याप्त वित्तपुरवठा करून, भारतीय शेतीचा विकास साधता येतो. भारतीय, शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो. तसेच दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे शेतकऱ्यांना होणारा तोटा ही आहे. कारण क्षेत्रीय ग्रामीण बँका, सहकारी समित्या तसेच वाणिज्य बँकाद्वारे दिलेली कर्जे वेळेत परत मिळत नाहीत. तसेच अलिकडील शेतकऱ्यांची वाढती आत्महत्या ही एक कृषीविषयक वित्तीय समस्या सुद्धा बँकिंग प्रणालीपुढे मोठे आव्हान आहे.

देशात वाढणारी लोकसंख्या व वारसाहक्क कायद्यामुळे शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात तुकडीकरण होऊन लागवडीखालील क्षेत्र कमी झाल्यामुळे, कृषी उत्पादन व उत्पादनक्षमता सारखी घटल्यामुळे कृषीक्षेत्राचा एकूण निर्यातीतील वाटा कमी होत आहे. शेती उत्पादनाचे नियोजन बाजारमागणीप्रमाणे तसेच शेती व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने होत नाही. शासकीय पातळीवर कृषी उत्पादनासंदर्भात निश्चित असे धोरण नसून, मागणी आणि उत्पादन यांची सांगड न घातली गेल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसतो.

शेतीमालाची योग्य अशी विक्री व्यवस्था नसून, शेतमालाला चांगला मोबदला शेतकऱ्यांना न मिळता मध्यस्थालाच मिळतो. शेतीमालाच्या प्रक्रियेसाठी दुय्यम व तिय्यम स्तरावर उद्योग स्थापन न झाल्यामुळे शेतीमालाची मूल्यवृद्धी होत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात कमी पैसा पडतो. शेती हा घटक राज्यांच्या कक्षेत येणारा विषय असून सुद्धा शेतमालाच्या किमती केंद्रशासन ठरवित असल्यामुळे प्रत्येक राज्यातील शेतीची स्थिती वेगवेगळी आहे. तसेच वाढत्या महागाईमुळे कृषीआदानांच्या भरमसाठ वाढणाऱ्या किंमती या सर्वांचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च व उत्पन्न यातील वाढत्या विषमतेमुळे, शेतीपासून प्राप्त अल्प वा ऋणात्मक बचतीमुळे थकीत कर्ज वाढून, शेतकऱ्यांवरील कर्जबाजारीपणा वाढत असल्याचे दिसून येते.

## भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीची भूमिका आणि महत्त्व

भारताच्या औद्योगिक विकासात शेती क्षेत्राचा वाटा महत्त्वपूर्ण असून, अनेक उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा हा शेती क्षेत्रातूनच केला जातो. तसेच छोट्या गावात व ग्रामीण भागात असणारे लघु व कुटीरोद्योग हे शेतीच्या आधारेच जीवित आहेत. जागतिक कृषि क्षेत्रातील वाट्यात भारत अन्नधान्य उत्पादनात जगात अव्वल असून गहू, तांदूळ, ऊस, कापूस, चहा यासोबतच गायी उत्पादनात भारत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश तर डाळी, ज्युट, म्हशी व दुग्ध उत्पादनात पहिला क्रमांक, अंडी उत्पादनात तिसरा क्रमांक कॉफी उत्पादनात पाचवा तर मटन उत्पादनात सहावा क्रमांक आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत किंमत स्थैर्य व आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी शेतीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे पंचवार्षिक तसेच वार्षिक योजनांच्या माध्यमातून शेतीच्या विकासासाठी विशेष खर्चाची तरतूद केली जाते. देशातील फार मोठ्या ग्रामीण व नागरी लोकसंख्येची उपजीविका प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून असल्यामूळे शेतीच्या विकासातून आर्थिक विषमता कमी करता येते.

## शेती संदर्भात तज्ज्ञांचे मत

प्राचीन काळापासून शेतीला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. आर्य संस्कृतीत शेती हा महत्वाचा व्यवसाय असल्याचे आढळून येते. भारतामध्ये जमिनीला महत्व असून यामध्ये उत्तम शेती, मध्यम व्यापार व तृतीय स्थान नोकरीला देण्यात आले होते. निसर्गवादयांचे म्हणणे होते की, समाजाच्या उन्नती व संपन्नतेचे साधन शेती या व्यतिरिक्त व्यवसाय, व्यापार करणारे अनुत्पादक घटक होत. प्रसिद्ध रोम तत्त्ववेत्ता सिसरो केटो, वाटो, कालूमेला इत्यादींनी शेतीची महत्ता सांगताना शेती ही समस्त सुबत्तेची आधार असून, त्याद्वारेच संपन्नता येते असे सांगितले आहे.

कृषीच्या विकासाचे महत्त्व स्पष्ट करतांना प्रसिद्ध अर्थशास्त्री कोल व हुवर यांनी म्हटले आहे की, "संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी प्रथम कृषीचा विकास झाला पाहिजे. जर कोणत्या क्षेत्राच्या विकासात दुसऱ्या क्षेत्राच्या अविकसितपणामुळे अडथळा निर्माण होत असेल तर ते अविकसित क्षेत्र कृषी असून ते अन्य क्षेत्राच्या विकासाला बाधक ठरते.

कवेस्ने यांच्या मते, शेती संपूर्ण राज्यांच्या संपत्तीचा व नागरिकांच्या धन प्राप्तीचा स्त्रोत आहे. म्हणून शेतीचा विकास होणे हे देश व देशातील नागरिकांच्या दृष्टिने फायदेशीर बाब आहे. ॲडम स्मिथनी निसर्गवाद्यांच्या विचारांना अमान्य केले असले तरी त्यांनी संपत्तीच्या उत्पादनक्रियेत शेतीला प्रमुख स्थान देऊन उत्पादनाला (उद्योगाला) दुसरे व व्यापाराला तिसरे स्थान दिले आहे.

ब्रांट व ट्राली यांच्या मते, "प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेची विविध क्षेत्रे परस्पर पुरक असल्याने कोणत्याही एका क्षेत्राचे महत्त्व जास्त राहू शकत नाही. शेतीच्या विकासाशिवाय अनेक उद्योगांचा विकास होणार नाही, तसेच उद्योगांचा जर विकास झाला नाही तर शेतीच्या विकासामुळे निर्माण होणारा जास्तीचा कच्चा माल बाजारपेठे अभावी पडून राहील. या दोन्हीच्या विकासासाठी दळणवळणाची कार्यक्षमता व विकास आवश्यक आहे. म्हणजे देशाचा विकास हा एका क्षेत्रावर अवलंबून आहे असे म्हणणे योग्य ठरत नाही."

बिल्सन, बार्कर आणि बारसोडी यांच्या मते, "शेती हा अर्थव्यवस्थेचा मुलभूत पाया आहे. जागतिक लोकसंख्येचा विचार करता बहुसंख्य लोक आपल्या उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. मानवाची अन्नाची प्राथमिक गरज हेच क्षेत्र पूर्ण करते आणि अनेक उद्योगांना कच्चा माल सुद्धा पुरविते. शेतमालाच्या निर्यातीवर अनेक अर्थव्यवस्था अवलंबून आहेत. त्यामुळे शेती हाच खरा मुलभूत व्यवसाय आहे."

## भारतीय शेतकऱ्यांपुढील समस्या

भारतीय शेतकऱ्यांसमोरील सर्व प्रकारच्या समस्यांचा पुढे आढावा घेतला आहे. भारतीय शेतकऱ्याला भांडवलाच्या अभावामुळे कृषीमालावर प्रक्रिया करून तो थेट बाजारपेठेत विक्री करण्यात अडचणी येतात. शेतमालाच्या उत्पादन खर्चापेक्षा मालाला मिळणारा बाजारभाव तसेच शासनाची अधिप्राप्ती किंमत आणि आधार किंमत (हमीभाव) हे अत्यंत कमी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सातत्याने घट होत आहे. अल्पभूधारक व सिमांतभूधारकांची संख्या एकूण भूधारकांच्या तुलनेत अधिक असून 'गरीबी' हे त्यांचे प्रमुख लक्षण असल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात वित्तीय समस्यांचा सामना करावा लागतो. दुष्काळ, पूर, आपत्ती, सूनामी, हवामानातील बदल यासारख्या सततच्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून याचा आर्थिक फटका शेतकऱ्याला बसतो. वाढती लोकसंख्या तसेच संयुक्त परिवाराऐवजी विभक्त परिवाराच्या वाढत्या धोरणामुळे जमिनीचे व्यापक विभाजन होवून शेतकऱ्यांच्या उच्चाटन व उत्पन्नात घट झालेली आहे.शेतमाल विपणनातील दोषांमुळे, शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होवून, त्यांना कमी दाम मिळतो. तंत्रज्ञान वापराच्या कौशल्यात्मक ज्ञानाचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाबाबतच्या अद्यावत, माहितीचा अभाव, तंत्रज्ञान व कृषी यातील परस्पर संबंधाबाबतचे अज्ञान तसेच शेती विषयक शिक्षाणाचा अभाव हे शेतकऱ्यांच्या संदर्भात मोठी समस्या आहे. शेतकऱ्यांकडे शेतीच्या विकासाच्या अनुषंगाने स्वत:च्या भांडवलाचा अभाव असतो.शेतकऱ्यांसमोरील उर्वरकाचा काळा बाजार ही सर्वात मोठी समस्या आहे.

## भारतीय शेती समोरील आव्हाने

भारतीय शेती समोरील महत्वाच्या आव्हानांसंदर्भात पुढील विविध बाबींचा आढावा घेतला आहे. भारतात शेतजमिनीचे वाढते विभाजन व तुकडीकरण ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे, भारतात शेतीची उत्पादकता घटत चालली आहे, अत्याधिक जलउपस्यामुळे क्षारपड जमिनीचे प्रमाण वाढत चालले आहे, देशात विजेची टंचाई असल्यामुळे शेतीसाठी विजेचा वापर मर्यादित आहे. देशात एकीकडे कृषी उत्पादनात वाढ घडवून आणली जात आहे व दुसरीकडे साठवणुकीच्या सोयी अभावी लाखो टन धान्य सडत आहे.देशात निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती क्षेत्रात कायम अनुकूल उत्पादन होत नसून प्रत्येक वर्षी त्यात घट किंवा वाढ होत आहे. भारतीय विपणनाच्या क्षेत्रात मध्यस्थांची भूमिका मजबूत असल्याने शेतकरी व ग्राहक कायम लाभापासून वंचित राहून खरा लाभ हेच मध्यस्थ गिळंकृत करतात. भारतात नदीचे पाणी व पुराच्या अयोग्य नियोजनामुळे देशात कोणत्या भागात कोरडा दुष्काळ तर कोणत्या भागात ओला दिसून येतो. देशातील उत्पादनाचे तंत्र शेतकऱ्यांच्या हलाखीची आर्थिक व शासनाचे शेतीविषयक धोरण सामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहचू न शकल्याने आजही बहुतांशी शेती परंपरागत तंत्राद्वारेच केली जाते. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांच्या अभावामुळे शेती क्षेत्रातही विकास न करण्याची मानसिकता बळावते. शेतीला भांडवलाची नेहमीच टंचाई भासते. देशात कार घ्यायला ९.९ टक्क्यांनी कर्ज सहज उपलब्ध असून ट्रॅक्टर साठी १४ टक्के व्याजदर द्यावा लागतो. भारतीय शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच जगतो व कर्जातच मरतो? हे कटू सत्य आजही सहज बघायला मिळते. शेतीतील संकट व समस्यांचा कळस उभा झाल्यावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या हेही वैशिष्ट्ये होऊ पाहता आहे.

## संदर्भ सूची


१) सोधी जे. एस., 'प्रॉब्लेमस् ऑफ मार्जिनल, अँड लँडलेस अग्रिकल्चरल लेबर्स', ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स रिसर्च सेन्टर, दिल्ली युनिवर्सिटी, १९७०.

२) टेंभेंकर प्रा. आशिष प्र., "नागपूर जिल्ह्याचा कृषी विकास – एक अभ्यास" (१९८५ नंतरचा कालखंड), रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

३) भांडारकर पु.ल., संशोधन पद्धतीशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, नागपूर, १९९६.

४) काचोळे दा.धो., समाजशास्त्रीय सिद्धांत, कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, २००२

५) कविमंडन विजय, २००६, 'कृषी अर्थशास्त्र' श्री. मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर.

६) महाजन ग. भ. (२००६) – विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, योजना, डिसेंबर २००६.

७) दातीर आर. के. (२००७) 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या शोध आणि उपाय, योजना, ऑक्टोबर २००७.

८) कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर, २००७.

९) जाधव कुंडलिक, “महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कृषीपतपुरवठा धोरण अवलोकन, आव्हाने व यशस्वीता महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, २००७.
१०) Singh R. D. and Mehrotra M. K. (1973) “problem of credit and indebtedness with the small and marginal farmers and agricultural labourers”, Indian co-operative review, Vol. 10.
११) Baluswami N (1974) “An empirical study on rural indebtedness”, Indian co-operative review, Vol. 12.
१२) National council for Applied Economic Research 1974 All India Rural household survey – saving Income and Investment New Delhi.
१३) Report of the National commission on agriculture (1976), Government of India, New Delhi.
१४) Gulati, A (2002), “Indian Agriculture in a Globalizing world”, American Journal of Agricultureal Economics, Vol. 84, No. 3.
१५) Kalpana Wilson (2002) “Small Cultivators in Bihar and ‘New Tehchnology choice or compulsion?” Economic and political weekly, March, 2002.
१६) Patil Balasaheb Vikhe (2005), “Rural Banking: Problems of Localized Banking Institutions”, Economic political weekly – 2005.
१७) Ramesh Golait (2007) “Current Issues in agriculture credit in India: As Assessment” Reserve Bank of India occasional papers, Vol. 28, No. 1, Summer 2007.